# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
## Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere
विद्याविहार, लोणेरे-रायगड ४०२ १०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)
Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140-275212
Website: www.dbatu.ac.in, E-mail: coe@dbatu.ac.in
**परीक्षा विभाग**

**Dr. Narendra S. Jadhav** | **डॉ. नरेंद्र सु. जाधव**
**Controller of Examinations (I/c)** | **परीक्षा नियंत्रक (प्र.)**


क्रमांक: डॉबाआंतंवि/परीक्षा विभाग/२०२५/३४३१ दि. २३/०४/२०२५

**परिपत्रक :**

विषय: विद्यापीठाच्या प्रथम अध्यादेशातील मार्गदर्शक सुचनांनुसार उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी व पुनर्तपासणी करण्याबाबत....

संदर्भ: ०१. विद्यापीठाच्या प्रथम अध्यादेशामधील पृष्ठ क्र ६४ वरील मुद्दा क्र O 7.4 (3-C)
०२. विद्यापीठाच्या प्रथम अध्यादेशामधील पृष्ठ क्र ६५ वरील मुद्दा क्र O 7.4 (4)

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून संल्लग्नीत विद्यालये व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या हिवाळी सत्रपरीक्षा २०२४ साठी फोटोकॉपी व उत्तरपत्रिका पुनर्तपासणीसाठी सुचनापत्रक काढण्यात आले असून त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व विद्यार्थी, पेपर सेटर, पेपर तपासणी व पेपर पुनर्तपासणी करणाऱ्या प्राध्यापक यांना कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भ क्र ०१ नुसार विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीसाठी अर्ज विहित नमुन्यात व वेळेत दाखल केल्यानंतर त्यांना सुचना पत्रकात दर्शविलेल्या कालावधीत फोटोकॉपी वितरीत केली जाते. विद्यार्थ्यांना मिळालेली फोटोकॉपी महाविद्यालयांमधील संबधीत विषयाच्या प्राध्यापकांकडून तपासून घेतल्यानंतर उत्तरपत्रिकांमध्ये मिळालेल्या एकुण गुणांच्या ५% किंवा त्यापेक्षा जास्त गुणांमध्ये बदल होत असल्याचे आढळल्यास विद्यालये व महाविद्यालयांचे संबधीत प्राचार्य/संचालकांच्या मार्गदर्शनाखाली उत्तरपत्रिकांच्या पुनर्मुल्यांकनासाठी विद्यापीठाचे विभागीय केंद्र व उपकेंद्रामध्ये उपस्थित राहण्यापूर्वी विद्यापीठाच्या प्रथम अध्यादेशानुसार आढळलेल्या विसंगतीच्या बाबतीत अशी सर्व प्रकरणे गोळा करतील आणि फोटोकॉपी जारी केल्याच्या शेवटच्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत संबंधीत विभागीय विशेष कार्य अधिकारी यांच्याकडे जमा करातील.

उपरोक्त संदर्भ क्र ०२ नुसार प्राचार्य/संचालकांनी सदर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची तपशिलवार माहिती विद्यापीठाच्या विभागीय केंद्र व उपकेंद्रामध्ये प्राप्त झाल्यानंतर उत्तरपत्रिकांच्या पुनर्तपासणी व मुळ गुणांमध्ये मिळालेल्या गुणांच्या ३०% किंवा त्यापेक्षा जास्त बदल होत असल्याचे निदर्शनास आले तर उत्तरपत्रिका तपासणी केलेल्या सर्व विषयांच्या संबंधीत प्राध्यापकांना व उत्तरपत्रिका पुनर्तपासणी करणाऱ्या प्राध्यापकांना विद्यापीठाच्या परीक्षा विभागामध्ये उपस्थित राहून याबाबतचे संपूर्ण स्पष्टीकरण देणे आवश्यक राहील. त्यानुसार चूक झाल्याचे आढळले तर विद्यापीठाकडून संबंधीतांवर कडक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

23/04/25

DR. B. A. TECHNOLOGICAL UNIVERSITY Lonere Raigad (M.S.)

परीक्षा नियंत्रक
**Controller of Examinations**
**Dr.Babasaheb Ambedkar Technological University**
**Lonere - 402103**
**Tal.Mangaon,Dist.Raigad.(Maharashtra)**

प्रति,
मा. कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

प्रत:
मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (माहीतीकरीता सविनय सादर)
मा. अधिष्ठाता (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर)